DR. BALASAHEB SAWANT KONKAN KRISHI VIDYAPEETH
REGIONAL AGRICULTURAL RESEARCH STATION
KARJAT- 410 201, Dist. Raigad, Maharashtra, India

DR.(MRS) P.D.PATIL
Associate Director of Research

PHONE – OFFICE : 02148-222035
E-mail : adrkarjat@rediffmail.com

**No.ADR/RARS/1443/of 2021**
ENT

**Date : 30 JUN 2021**

प्रति,

............................

............................

............................

**विषय : वाहन भाडयाचे दरपत्रक...**

प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र, कर्जत जि. रायगड येथे किटकशास्त्र विभागात प्रयोगांना वारंवार भेटी देणे आवश्यक असते तसेच वेळोवळी शेतकऱ्यांच्या प्रक्षेत्राला भेटी देणे, प्रशिक्षणे, मेळावे, शेतकरी शास्त्रज्ञमंच, विविध सभा, चर्चासत्रे, विविध ठिकाणी मिटींग व इतर ठिकाणी वारंवार भेटी सन २०२१–२२ या आर्थिक वर्षामध्ये खाजगी वाहन AC or Non AC भाडेतत्वावर घ्यावयाचे आहे. तरी प्रती किलो मीटर, तसेच संपुर्ण दिवसाचे दर (इंधनासह), यांचे दरपत्रक सोबत दिलेल्या अटी व शर्तीना अधिन राहून या कार्यालयास दिनांक **15/07/2021** पर्यंत सादर करावे.

**सदर दरपत्रकावर किटकशास्त्र विभाग असे नमुद करावे.** त्यासंबंधिच्या अटी व शर्ती खालील प्रमाणे.

१ प्रत्येक वाहनासाठी तपशीलवार माहिती असलेले स्वतंत्र लॉगबुक ठेवावे.
२ वाहन ताब्यात घेतल्यापासुन ते परत केल्यापर्यंतचा कालावधी भाडे अदायगीसाठी धरावा.
३ १२ तासापर्यंतचा कालावधी अर्धा दिवस तर १२ तासापेक्षा जास्त कालावधी झाल्यास पुर्ण दिवस म्हणजेच २४ तासाचे भाडे अदा करावे.
४ इंधन शासकीय कार्यालयातर्फे कोष्टकानुसार पुरविण्यात येईल किंवा त्याचा खर्च कि.मी. प्रमाणे (कोष्टकाप्रमाणे) सरासरी काढुन वेगळा देण्यात येईल. त्यासाठी झालेली धाव कि.मी. मध्ये प्रत्यक्ष तपासली जाईल.
५ वाहन शक्यतो ५ वर्षापेक्षा जास्त जुने नसावे.
६ वाहनाचा मेंटेनन्स खर्च, इतर खर्च तसेच अपघात झाल्यास त्याची संपुर्ण जबाबदारी वाहन मालकाचीच राहील.
७ वाहनाचे / चालकाचे सर्व कागद पत्र जसे नोंदणी, कर, विमा, योग्यता प्रमाण पत्र, परवाणा, वायु प्रदुषण नियंत्रण प्रमाणप्रत्र (पीयुसी), चालकाची अनुज्ञप्ती, बॅच इत्यादी वैध असणे आवश्यक आहे.
८ पिवळया पाटीच्या वाहनदारकांची दरपत्रके स्वीकारण्यात येतील.
९ वाहन ताब्यात घेतल्यापासुन ते परत केल्यापर्यंतचा कालावधी भाडे अदायगीसाठी धरावा.
१० टीडीएस किंवा अन्य कायदेशीर वजाती आवश्यक असल्यास त्या करुन त्याचे प्रमाणपत्र संबंधिताय द्यावे.
११ मुक्कामाचा (हॉल्टींग चार्ज) वाहन चालकाचा खर्च वेगळा दिला जाणार नाही.
१२ वाहन चालकाचा वाहन चालविण्याचा वेगळा भत्ता दिला जाणार नाही. तसेच वाहन चालकाचा जेवणाचा खर्च वाहन मालकाने करावयाचा आहे.
१३ वाहनाच्या प्रकारानुसार वाहनांमध्ये 2 ते 3 व ५ ते ६ व्यक्तींना प्रशस्तपणे बसता यावे.
१४ वाहन आवश्यकतेनुसार उपलब्ध व्हावे.
१५ दरपत्राकात नमुद केलेले दर हे ३१ मार्च २०२२ पर्यंत लागु राहतील.
१६ टोल व पार्किंग चार्जेस वाहन वापरणाऱ्या कार्यालयाने भरावयाचे आहे.
१७ आपले दरपत्रक या कार्यालयाकडून मंजुर झाल्यास वरील शासकीय नियमाप्रमाणे शर्ती व अटी रु. १०० च्या बॉन्ड पेपरवर करारनामा लिहुन देण्यात यावा या कार्यालयास सादर करावा लागेल.

**गाडीचा प्रकार**

**1.इनोव्हा/ स्कॉर्पियो/एर्टिगा** इंधनाचा प्रकारासह

**2.इंडिका/ व्यागनॉर/ इंडिगो/ स्विफ्ट/ एकसेन्ट (कूल कॅब)** इंधनाचा प्रकारासह

आपला विश्वासू,

30/6

सहयोगी संशोधन संचालक